सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

**क्रमांक : एलजेआर-१९२७/प्र.क्र.५६५/२०२४/जाहिरात** **दिनांक :१९ नोव्हेंबर, २०२६**

## -: प्रसिद्धीपत्रक :-

### दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा – २०२४

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा – २०२४ करीता जाहिरात क्रमांक ०१३/२०२६ दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीद्वारे किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव असलेल्या पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

**२.** दरम्यान, रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक १११०/२०२५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २१ ऑगस्ट, २०२६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, आयोगामार्फत दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ पूर्वी विधी शाखेची पदवी प्राप्त केलेल्या नवीन पदवीधर उमेदवारांनाही प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. त्यानुसार, अशा उमेदवारांकडून दिनांक २६ ऑक्टोबर, २०२६ ते ०९ नोव्हेंबर, २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारण्यात आले आहेत.

**३.** तद्नुषंगाने दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा – २०२४ ही परीक्षा **रविवार, दिनांक ०३ जानेवारी, २०२७** रोजी राज्यातील छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नवी मुंबई आणि नागपूर जिल्हा केंद्रावर घेण्यात येणार असल्याबाबतच्या जाहिरातीचे शुद्धीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी परीक्षेच्या दिनांकाची व परीक्षा आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हाकेंद्रांची नोंद घ्यावी.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.